शोध सारांश

"नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन"

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या समाजशास्त्र विषयातील पीएच.डी.

(समाजशास्त्र) पदवीकरिता सादर करावयाचा शोध सारांश

संशोधक

श्री विष्णु सखाराम मेटकर
सामाजिकशास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.वि.,नांदेड

मार्गदर्शक

डॉ.डी.एस.चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जानेवारी-2018

"नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन"

प्रस्तावना :-

आधुनिक भारतीय समाजाचा समाजशास्त्रीय विचार करताना " शहरी समाज" व "ग्रामीण समाज" असे विभाजन केले जाते, असे विभाजन करताना एका महत्वाच्या परिसराकडे आणि समूहाकडे आपले जरा दुर्लक्ष होत आहे. तो म्हणजे रानावनात, दऱ्याकपाऱ्यात राहणारा आदिवासी समाज होय. आदिवासीं बद्दल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे, जंगल दऱ्याखोऱ्यात राहणारे रानटी, जंगली लोक खर पाहता आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी, बाहेरुन येणाऱ्या सबळांनी त्यांचे सखल प्रदेश व्यापले आणि त्यांना जंगल दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला. ते कायमचे दूर झाले, इतरांनीही त्यांच्याकडे दूर्लक्ष केले. त्यामुळे शेकडो वर्षे ते अज्ञानी आणि अशिक्षित राहीले तरीही त्यांनी त्यांची मूळ संस्कृतीची मूल्य ही जपली.

जगात आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत दक्षिण आफ्रिकेनंतर भारताचा क्रमांक लागतो. देशातील अर्ध्यापेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओरिसा, झारखंड आणि गुजरात या राज्यांमध्ये आहे. आदिवासी लोकसंख्येची सर्वाधिक घनता मध्यभारत आणि उत्तरी राज्यांमध्ये आहे. तरी परंतु हरियाणा, पंजाब, दिल्ली, पाँडेचेरी आणि चंदिगढ वगळता सर्वच राज्य व संघराज्याच्या क्षेत्रामध्ये दिसून येतात. देशातील सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेले राज्य म्हणजे अरूणाचल प्रदेश, मेघालय, मिजोराम, नागालँड आणि केंद्रशासित प्रदेश असलेले दादरा-नगर हवेली व लक्षद्विप आहेत. या ठिकाणची आदिवासी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा अधिक आहे. आदिवासी समुदाय हा देशातील विभिन्न अशा जंगल, डोंगर, दऱ्याखोऱ्यात कोणीही न पोहचू शकणाऱ्या दूर्गम भागात राहतो.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लक्ष १० हजार २१३ असून त्यापैकी पुरुषांचे संख्या ५३ लक्ष १५ हजार २५ व महिलांची संख्या ५१

लक्ष ९५ हजार ११८ आहे व त्याचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ९.३५% एवढे आहे. राज्यात एकूण ४५ आदिवासी जमाती असून, या जमाती महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात आढळून येतात. महाराष्ट्रात ठाणे, पालघर, नंदूरबार, नाशिक, अमरावती, गडचिरोली, जळगांव, अहमदनगर, धुळे, पुणे, रायगड, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर, नांदेड व नागपूर अशा सोळा जिल्ह्यात आदिवासींचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात आहे.

स्वातंत्र्य प्राप्ती पासून आज पर्यंत बहुतांश समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय विकास झाल्याचे सर्वसामान्यपणे दिसून येते. पण आदिवासी समाज अजूनही विकासापासून दूरच आहे. सरकारने आदिवासी लोकांचा विकास करुन त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी विकासाचे अनेक कार्यक्रम राबवले. त्यासाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासावर भर दिला परंतु दूर्देवाने या दोन्ही गोष्टी आदिवासींपर्यंत पोहचू शकल्या नाहीत.

पारंपारिक विचारात स्त्रियांकडे एक उदासीन आणि परावलंबी अस्तीत्व अशा साच्यामध्ये बघितले जाते तर पुरुषांना मात्र कृतिशील स्वतंत्र व्यक्ती असे मानले जाते. पारंपारिक भूमिकानुसार स्त्रियांना गृहिणी आणि पुरुषांना पोषणकर्ता मानले गेल्याने लग्न आणि कुटुंब या संस्था स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामध्ये पायाभूत ठरतात. लैंगीक विषमतावादी गैरसमज आणि भेदभाव केला गेल्याने समकालीन समाजामध्ये सर्व ठिकाणी स्त्रिया दुय्यम बनविल्या जातात. उदा.आपल्या समाजातील शिक्षण संस्था, साहित्य, रोजगाराचा व्यवहार, करारा संबधी हक्क, संपत्ती विषयक हक्क या सर्वांमधून विविध पुरुषी क्षेत्रांमधून स्त्रियांना नेहमीच वगळले जाते. आदिवासी स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने होणे आवश्यक आहे. केवळ प्रत्येक शाखेच्या शेवटी शेपूट म्हणून स्त्रियांच्या अभ्यासाची भर घालून चालणार नाही तर विद्यापीठातून आणि स्वतंत्र संस्थातून आदिवासी स्त्री जीवनाचा अभ्यास सामाजिक शास्त्रांच्या वेगवेगळया शाखांतून अभ्यासणे आवश्यक आहे.

आदिवासी समाजाची व्याख्या :-

१. डी.एन.मुजूमदार यांच्या मते :-

"समान नाव धारण करणारा, समान भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय बाबतीत सारख्याच निषेध नियमांचे पालन करणारा आणि परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्विकारणारा समाज आदिवासी समाज होय."

२. बोगाडर्स यांच्या मते :-

"सुरक्षिततेची जरुरी, रक्त संबधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला आहे." बोगार्डस यांनी प्रमुख दोन बाबींवर प्रकाश टाकलेला आहे, तो असा समूह आहे की समूहातील सर्व सदस्याला सुरक्षितता प्रदान करतात आणि सर्वांना समान व एकच रक्त संबधी मानतात. एकाच पूर्वजापासून उत्पत्ती यावर विश्वास ठेवतात आणि तशी कर्तव्य पार पाडतात.

३. डॉ.रिव्हर्स यांच्या मते :-

"ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्ती करिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजीक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात." आदिवासी हा समाज साधा आणि प्रामाणिक समूह आहे की ज्या समूहातील सदस्य एकसमान एकच बोलीभाषा बोलतात यूद्धा सारख्या व संकटकालीन प्रसंगात एकतेचे प्रदर्शन घडवतात.

वरील वेगवेगळ्या विचारवंतानी केलेल्या व्याख्येवरून आदिवासींचा अर्थ असा स्पष्ट होतो की, आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजा पेक्षा अनेक दृष्टीनी वेगळा असल्याचे प्रचितीस येते. एकंदरीत आदिवासी समाजा विषयी सांगावयाचे झाल्यास समाज जीवन पद्धती, एका विशिष्ट भूप्रदेशात निवास, एकाच रक्त संबधावर आधारित, समान धर्म, स्वतःची वेगळी अशी लिपी विरहीत बोलीभाषा, विज्ञानाच्या बाबतीत

मागसलेला, सामाजिक एकजिनसीपना, पारंपरिक रुढी, प्रथा, चालिरिती इत्यादी वेगळेपणा जोपासणारा समाज म्हणजे आदिवासी म्हणता येईल.

- **संशोधन आराखडा :-**

संशोधन अध्ययनाचे महत्व :-

आदिवासी समाज यांच्या बाबत सर्व जगात सारखेच कुतूहल दिसून येते. प्रगत समजणाऱ्या सुशिक्षित नागरी समाजात आदिवासीं बाबत फारच कमी माहिती असते. परंतु दऱ्याखोऱ्यात राहणारे आदिवासी हे नैसर्गिक जीवन जगतात, त्यांचे जीवन म्हणजे रानावनात उगवणाऱ्या वनस्पती प्रमाणे आहे असे असून ही कोणाच्याही पूढे भिक्षेसाठी हात न पसरविता निसर्ग आपला सखा मानून आणि मिळणाऱ्या साधनावर आपले पोट भरून सदोदित आनंदी असणारा, कष्टमयी जीवन जगताना सुद्धा त्यात समाधान मानणारा आपल्या खास शैलीत जीवन जगणारा आहे.

आधुनिक काळात देखील आदिवासी समूदायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे आणि भारत सरकारतर्फे तसेच संविधानातील विविध तरतूदी मार्फत आदिवासींचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतू ज्या प्रमाणात अपेक्षित विकास आदिवासींचा व्हायला पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला दिसून येत नाही. कुठल्याही समाजाचा दर्जा हा त्या समाजातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असतो आणि भारतीय समाज व्यवस्थेत तर स्त्रियांना दुय्यम व गौण स्थान देण्यात आलेले आहे व त्यातल्या त्यात आदिवासी समाज इतर समाजाच्या तुलनेत अतिशय मागास, दुर्गम व डोंगर कपाऱ्यात राहणारा समुदाय आहे. आदिवासी समाजातील स्त्रियांचे जीवन कश्या पद्धतीचे आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणे संशोधकाला महत्वपूर्ण वाटले. प्रत्येक मानवाचा जीवनात त्याचे सामाजिक-आर्थिक जीवन हे महत्वाचे असते याचा विचार करुन आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे हे संशोधकाला आवश्यक गरजचे वाटले आणि हा अभ्यास समाजशास्त्रीय पद्धतीने करुन वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकामार्फत करण्यात येणार आहे, याच बरोबर हे संशोधन सैद्धांतीक आणि व्यवहारिक दृष्ट्या महत्वपूर्ण आहे.

संशोधन समस्या :-

प्रस्तुत संशोधन हे "आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भः नांदेड जिल्हा). आज पर्यंत अभ्यासकांकडून आदिवासींवर संशोधन झाले. परंतु आदिवासी स्त्रियांवर संशोधनाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. कुठल्याही समाजाचा महत्वाचा घटक म्हणजे त्या समुदायातील स्त्री असते आणि प्रस्तुत संशोधना मध्ये नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययन करुन त्याची शास्त्रशुद्ध माहिती घेऊन तथ्य संकलित केली जाणार आहेत. प्रस्तुत संशोधन करण्यासाठी गुणात्मक संशोधन पद्धती व संख्यात्मक संशोधन पद्धती या दोन्हीची सांगड घालून संशोधनाची प्रक्रिया पुर्ण करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनाच्या आराखड्याचे स्वरुप वर्णनात्मक आहे. या संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनीयतत्व व वास्तविकता हा असतो. म्हणूनच संशोधकाने सदरील संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा पद्धतीची निवड केलेली आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे :-

१. आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

२. आदिवासी समुदायातील स्त्रियांची वर्तमान स्थिती अभ्यासणे.

३. आदिवासी समुदायातील स्त्रियांची भूमिका व दर्जा यांचा अभ्यास करणे.

४. आदिवासी स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५. आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक जीवनासंबधीचा अभ्यास करणे.

६. आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.

गृहीतकृत्य :-

१. आदिवासींमध्ये स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम व कनिष्ठ आहे.

२. आदिवासी समुदायातील स्त्री ही सामाजीक दृष्ट्या मागसलेली आहे.

३. आदिवासी संरक्षण कायदे व विविध शासकीय योजनांमुळे आदिवासी समुदायाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

४. आदिवासी समुदायातील स्त्री आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या जोडीदारावर अवलंबून आहे तिला आर्थिक स्वातंत्र्य नाही.

५. आदिवासी स्त्रियांचा साक्षरता दर हा हळूहळू उंचावत आहे.

नमुना निवड :-

आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे अध्ययन करणे हा संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये एकूा १६ तालुके आहेत. नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३६१२९२ आहे व एकूण लोकसंख्ये पैकी २८१६९५ आदिवासी समाजाची लोकसंख्या असून त्यांचे प्रमाण जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाशी ८.३८% आहे.

संशोधनासाठी नांदेड जिल्हा हा समग्र (Universe) म्हणून निवडण्यात आला. राज्य सरकारद्वारा घोषित आदिवासी उपयोजना क्षेत्र धोरणानूसार मराठवाडा क्षेत्रातील ए.आ.वि.प्र.किनवट अंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेले अंशतः तालूके म्हणून किनवट, हदगांव, भोकर, हिमायतनगर आणि माहूर या पाच तालुक्याचा समावेश होतो. ह्या पाचही तालुक्यात ५०% पेक्षा अधिक आणि बहुसंख्य आदिवासी गावे वास्तव्यास आहेत. सहेतूक नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling method) ने किनवट, हदगांव, भोकर, हिमायतनगर आणि माहूर यांची उपसमग्र म्हणून निवड करुन त्यातून प्रत्येकी चार गावे या पद्धतीप्रमणे संशोधनासाठी २० गावाची निवड केली जाणार आहे व प्रत्येक गावातून १५

कुटुंबाचा अभ्यास केला जाईल अशा पद्धतीने एकूण ३०० नमुने संशोधन अध्ययनासाठी निवडण्यात येतील.

अध्ययनाची मर्यादा :-

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर आधारीत आहे. प्रस्तुत संशोधन हे राज्य सरकारद्वारा घोषित "आदिवासी उपयोजना क्षेत्र" १ एप्रिल १९७६ च्या निर्णयानुसार मराठवाडा क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेले अंशत तालुके म्हणून किनवट, हदगांव, भोकर, हिमायतनगर आणि माहूर या पाच तालुक्यांचा समावेश होतो. त्यामुळे प्रस्तुत संशोधन या पाच तालुक्या पुरतेच मर्यादीत आहे व वेगवेगळ्या पद्धतीने संकलीत करण्यात येणारी शासकीय आकडेवारी व शासकीय गोपनिय बार्बीमुळे काही प्रमाणात मर्यादा पडतात.

तथ्य संकलन पद्धती :-

प्राथमिक स्त्रोत :-

आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाणे खूपच कमी असल्याने अध्ययन क्षेत्रात प्रश्नावलीचा वापर करणे हे अनुपयुक्त ठरले असते. त्यामुळे मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर करुन त्यात बंदीस्त प्रश्नांचा समावेश करण्यात येणार आहे, त्याच बरोबर निरीक्षण तंत्राचा वापर देखील तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत :-

द्वितीय स्त्रोतामध्ये शासनाने प्रकाशीत केलेल्या माहिती पुस्तिका, शासकीय सर्वेक्षणे अहवाल, जनगणना अहवाल, विविध पुस्तके, विश्वकोश आदिवासी संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे, त्रैमासिके, साप्ताहिके, मासिके व प्रकाशित व अप्रकाशित शोधप्रबंध इत्यादी माहिती स्त्रोताचा अवलंब करण्यात येणार आहे.

अध्ययनाची व्याप्ती :-

प्रस्तुत अध्ययन आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे समाजशास्त्रीय अध्ययना अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील आदिवासी बहूल लोकसंख्या असलेल्या तालुक्यातील आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनापूरतेच मर्यादित राहील.

प्रकरणाची रचना :-

१. प्रस्तावना आणि सैद्धांतिक स्वरुप

२. पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा

३. संशोधन पद्धती

४. आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक जीवनाचे विश्लेषण

५. आदिवासी समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचे विश्लेषण

६. संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी

सांख्यिकीय साधनात वर्गीकरण, प्रतिशत प्रमाण, आलेख या साधनांचा उपयोग केला जाणार आहे. माहितीचे संकलन केल्यानंतर त्यातून प्राप्त झालेल्या तथ्यावर प्रक्रिया करुन निष्कर्ष व त्यानुसार गृहीत्यकृत्यांची पडताळणी केली जाईल व संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांच्या आधारावर शिफारशी सूचविल्या जातील."

संदर्भसूची

१. बी.एम.कऱ्हाडे, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापूरे अँण्ड कं.पब्लीशर्स, नागपूर, २०१०.

२. गो.चवरे, आंध जमातः लोकसाहीत्य आणि संस्कृती, शब्दवैभव प्रकाशन, पुणे, २०१६.

३. पू.ल.भांडारकर, सामाजिक संशोधनपद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.

४. प्रदिप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.

५. दा.धो.काचोळे, आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लीकेशन्स, औरंगाबाद, २००९.

६. प्रदिप आगलावे, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६.

७. राजेश धनजकर, आंध जमातः शोध आणि बोध, अनुराधा पब्लीकेशन्स, नांदेड, २०१२.

८. भीमराव पिंगळे, आदिवासी एवं उपेक्षित जन, विकास प्रकाशन, कानपूर-१९९६.

९. लोकराज्य, आदिवासी ते अग्रक्रम, ऑगस्ट-२०१६.

१०. यशवंत चावरे, अनुसूचित जाती-जमातीचे कल्याण व संरक्षण कायदे आणि त्याची अंमलबजावणी, मनोविकास प्रकाशन, पुणे-२००९.

११. गोविंद गारे, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २०००.

१२. आदिवासी विकास विभागाची वेबसाईट- www.mahtribal.gov.in.

१३. महाराष्ट्र शासनाची वेबसाईट- www.maharashtra.gov.in.

१४. नांदेड जिल्ह्याची अधिकृत वेबसाईट- www.nanded.nic.in

संशोधक

विष्णु सखाराम मेटकर
सा.शा.सं.स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,
नांदेड

मार्गदर्शक

डॉ.डी.एस.चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शारदा महाविद्यालय, परभणी